बीड । मंगळवार
२४.०६.२०२५
वर्षे : ५ अंक : ८४
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# समाज कल्याण विभागाच्या अनुदानित निवासी वस्तीगृहांना लागली घरघर !



## बोगस विद्यार्थी संख्या दाखवत शासनाकडून लाटले जात आहेत लाखोचे अनुदान !

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रामध्ये समाजकल्याण विभागामार्फत मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृहे चालवली जातात. या वसतिगृहांमध्ये, मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थी आणि इतर गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आणि उच्च शिक्षणासाठी सोय मिळावी यासाठी प्रवेश दिला जातो. तसेच राज्यात समाज कल्याण विभागामार्फत अनुदानित निवासी वसतिगृह चालवली जात आहे. या वस्तीगृहामधून विद्यार्थ्यांना राहण्याची व जेवणाची सोय यासह शासनाकडून स्कॉलरशिप दिली जाते. निवासी वसतिगृह ची अवस्था बिकट झाली आहे. अनेक ठिकाणी वस्तीग्रह आहेत मात्र विद्यार्थी नसल्याने फक्त कागदोपत्री विद्यार्थी दाखवत शासनाकडून अनुदान लाटण्याचे प्रकारही जिल्ह्यात सुरू आहे. समाज कल्याण विभागत यासाठी स्वातंत्र्य विभाग यासाठी कार्यरत आहे. प्रत्येक वर्षी अशा अनुदानित निवासी वस्तीग्रहची तपासणी होते. मात्र मोठ्या प्रमणात विविध सामाजिक न्याय विभागाच्या योजना चे लाभ घेतले जात असून बीड जिल्ह्यात निवासी वस्तीग्रहांचा मोठा घोटाळा सुरू असून याकडे सामाजिक न्याय विभागातील अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असून शासनाचे लाखो रुपये या वस्तीग्रह चालकांच्या घशात जात आहे. बीड जिल्ह्यात अनेक तालुक्यात व ग्रामीण भागात समाज कल्याण विभागामार्फत ही अनुदानित वस्तीग्रह चालवली जातात. शासकीय वस्तीग्रह प्रमाणे अनुदानित वसतिगृहना शासकीय अनुदान प्राप्त असते. प्रत्येक विद्यार्थ्याच्या पाठीमागे राज्य शासन मोठी तरतूद करत आहे मात्र याचा खरंच फायदा विद्यार्थ्यांना होत आहे का असा प्रश्न उपस्थित होत असून वस्तीग्रहांच्या नावाखाली फक्त वस्तीग्रह चालकांचा भले होत आहे का ?

जिल्ह्यात मुला -मुलींसाठी असून, वेगवेगळ्या आणि तालुक्यांमध्ये उपलब्ध आहेत. काही खासगी संस्था देखील चालवतात, ज्यांना शासनाकडून अनुदान मिळते.

मागासवर्गीय मुला-मुलींसाठी वसतिगृहे: या वसतिगृहांमध्ये, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना प्रवेश

▶▶ उर्वरित पान २ वर

# सार्वजनिक बांधकाम विभागाच्या डोळ्यात धुळ ११२ कोटींच्या कामाला कोणाचे बळ

## आमदार विजयसिंह पंडितांचे दुर्लक्ष ; अजमेरा कन्स्ट्रक्शन विरोधात मुख्यमंत्र्यांना तक्रार !

**गेवराई । प्रतिनिधी**

११२ कोटी रूपयाच्या बोगस कामाचा परवानाच, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी उस्मानाबादच्या अजमेरा कन्स्ट्रक्शन कंपनीला दिलाय का ? असा सवाल उपस्थित केला जात असून, अजमेरा कन्स्ट्रक्शन कंपनीचा संचालक दिवसा ढवळ्या बोगस काम करत आहे. अत्यंत महत्त्वाच्या रस्ता कामात वाळू, सिमेंट ,माती मिश्रित खडी वापरून आणि कमी थिकनेस असलेले पॉलिथीन वापरून निकृष्ट काम केले जात आहे. रविवार



▶▶ उर्वरित पान २ वर

# शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी बँकेकडून होणाऱ्या अडवणुकी विरोधात शिवसेनेने घेतली बँकेची शाळा

## जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या नेतृत्वाखाली बँकेची कान उघडणी

**बीड । प्रतिनिधी**

सध्या सुरु असलेल्या खरीप हंगामात शेतकऱ्यांस आर्थिक अडचण निर्माण होत आहे. एक रुपयात पीक विमा ही योजना शासनाने गुंडाळली. तर नवीन पीक विम्या साठी शेतकऱ्यांना बँकानी प्रचंड नियम व अटी लादल्या आहेत. बँके कडुन शेतकऱ्यांचे सिबिल तपासले जात आहे. या



विरोधात शिवसेना पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे व विरोधी पक्ष नेते अंबादासजी दानवे यांच्या शेतकरी हिताच्या संकल्पने नुसार जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी भारतीय स्टेट बँकेच्या मुख्य शाखेत जाऊन अधिकाऱ्यांची

▶▶ उर्वरित पान २ वर

# धामणगाव येथे अवैध वाळू वाहतूक करणारे टिप्पर पकडला: चालकावर कारवाई, टिप्पर अंभोरा पोलिसांकडे जमा

**कडा । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील धामणगाव येथील बीड-अहिल्यानगर राज्य महामार्गावरील पाथर्डी चौकात विनापरवाना वाळूची चोरटी वाहतूक टिप्परच्या साहाय्याने होत असल्याची माहिती अंभोरा पोलिसांना मिळताच रविवार (दि.२२) रोजी रात्रीच्या सुमारास कारवाई करत १० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हद्दीतील धामणगांव येथील पाथर्डी चौकात रविवार



▶▶ उर्वरित पान २ वर

# बीड पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी ! दहा लाख ५० हजार रुपयांचे दागिने केले परत

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या चोरीच्या गुन्ह्यात डॉक्टर लक्ष्मीकांत तांदळे यांच्या घरातून चोरीस गेलेले सुमारे साडे दहा लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने बीड पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत हस्तगत करून मूळ मालकास परत केले.

दिनांक २३ जून रोजी पोलिस अधीक्षक श्री. नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचीन



▶▶ उर्वरित पान २ वर

# शेतकऱ्यांना पीक कर्ज नाकारल्यास शाखा अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळे फासु-जिल्हाप्रमुख गणेश वरेकर



**बीड । प्रतिनिधी**

बीडमधील स्टेट बँक ऑफ इंडिया च्या मुख्य शाखेमध्ये शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने 'बँकेची शाळा' आंदोलन करण्यात आले. पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना सचिव विनायकजी राऊत, संपर्कनेते सुनिलजी प्रभू, महाराष्ट्र विधानपरिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादासजी दानवे साहेब व संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली तसेच शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत आज बीड शहरातील बँक ऑफ इंडियाच्या जालना रोड बीड येथील मुख्य शाखेमध्ये आंदोलन करण्यात आले.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे बीड जिल्ह्यातील पक्षाच्या वतीने बँकांची शाळा हा उपक्रम राबविण्यात आला यावेळी संबंधित शाखेच्या शाखा व्यवस्थापक यांना आत्तापर्यंत किती शेतकऱ्यांना कर्ज दिले आहेत, किती अर्ज आले आहेत,

▶▶ उर्वरित पान २ वर

# भारतीय स्टेट बँक शाखा माजलगाव यांनी काढलेल्या जमीन विक्री लिलावास न्यायालयाकडुन स्थगीती

**माजलगाव । प्रतिनिधी**

भारतीय स्टेट बँक माजलगाव यांनी काढलेल्या जमिनी विक्री लिलावास माजलगाव दुसरे सह दिवाणी न्यायाधीश यांनी पुढील आदेशापर्यत तुर्तातुर्त मनाई आदेश दिला आहे.

याबाबत असे की, माजलगाव येथील भारतीय स्टेट बँक यांनी दिनांक २९.०५.२०२५ रोजी ई-लिलाब नोटीस प्रकाशीत करुन मे राधे राधे कॉट स्पिनींग प्रो. प्रा. राधेश्याम रामेश्वर दायमा यांनी कर्जास गाहन ठेवलेली मौजे धनगरवाडी ता. माजलगाव जि.बीड येथील गट क्र. ६१ मधील ०० हे. ८१ आर जमीन सदर कर्जाची कसलीही माहिती न देता अभिनंदन दुगड यांनी सन २०२३ साली खरेदीखताद्वारे विक्री करुन प्रत्यक्ष ताब्यात दिली व पुढे ती अभिनंदन दुगड यांनी शहा मोसीन नयुम शहा, नय्युम शहा हाजी



पाशा शहा व मोहम्मद अकबर अब्दुल मज्जीद कच्छी यांना खरेदीखताने विक्री करुन मालकी हक्काने प्रत्यक्ष ताब्यात दिली होती व त्यांनी सदरची मालमत्ता अकृषी परवानगी मोजणी व ईतर परवानगी अंती प्लॉटींग उपयुक्त बनवलेली आहे. परंतु सदरची मालमत्ता पुर्वीच मुळ मालक दायमा यांनी बँकेकडे गाहन ठेवलेली असल्याने व कर्जाची परत फेड कर्जदार दायमा व जामीनदार यांनी परत फेड न केलेने ती मालमत्ता बँकेने विक्री

▶▶ उर्वरित पान २ वर

# गांजाच्या शेतीवर पोलिसांचा छापा तीन लाख ९४ हजार किमतीची झाडे जप्त!

**बीड । प्रतिनिधी**

गोपनीय माहितीनुसार मौजे मळेगाव गावाचे शिवारात सिध्देश्वर भिसे नामक व्यक्तीने त्याचे शेतात गांजाची झाडे जोपासली असलेबाबत प्राप्त माहितीनुसार आजरोजी छापा घातला असता सिध्देश्वर भिसे नामक व्यक्तीचे शेतात ३,९४,०००/- रू. किंमतीची १९.७ कि. ग्रॅम वजनाची गांजाची झाडे मिळून आली. सदरचा सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असून संबंधिताविरूध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. सदरची कामगिरी नवनीत सर, पोलीस अधिक्षक, बीड, श्रीमती चेतना मॅडम अप्पर पोलीस अधिक्षक, अंबाजोगाई, कमलेश सर, मा. सहा. पोलीस अधिक्षक, केज यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती पूजा मॅडम, परि. पोलीस उपअधिक्षक, सपोनि मच्छिद्रनाथ, प्रभारी अधिकारी, युसफ वडगाव पोलीस ठाणे, पोहवा/९९६ बालासाहेब, पोहवा/१२९१ सीताराम, पोहवा/१५३१ संपत, पोना/१८३७ दिलीप, पोना/१०३५ अनिल, पोना/१८६० राजू यांनी केली.



# पाटोदा महावितरण कर्मचाऱ्यांवर प्राणघातक हल्ला; आरोपीला अटक करण्यासाठी महावितरणचे रस्तारोको आंदोलन



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा महावितरण कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यावर करण्यात आलेल्या प्राणघातक हल्ल्याच्या निषेधार्थ आणि आरोपीस तात्काळ अटक करण्यात यावी, या मागणीसाठी महावितरण कर्मचाऱ्यांनी आज शहरातील मुख्य चौकात रस्ता रोको आंदोलन छेडले.प्राथमिक माहितीनुसार, पाटोदा महावितरण कार्यालयातील कर्मचाऱ्यावर कार्यालयात कामाच्या ठिकाणीच हल्ला करण्यात आला होता. यानंतर संबंधित कर्मचाऱ्याने पोलीस ठाण्यात

▶▶ उर्वरित पान २ वर



# झरे केवळ पाण्याचा पुरवठाच करत नाहीत, तर ते नद्यांचे स्रोतही

पाण्याचा झरा म्हणजे पृथ्वीच्या पृष्ठभागावर नैसर्गिकरीत्या उगम पावलेल्या भूजलाचे विसर्जन. पर्वतांच्या कुशीतून वाहणाऱ्या झऱ्यांमुळे छोटे-मोठे तलाव, कुंड तयार होतात.



मोठ्या नद्या आणि जलप्रवाह असताना लहान झऱ्यांची गरज काय, असे वाटू शकते. परंतु, नीती आयोगाच्या अहवालानुसार, भारतातील सुमारे २० कोटी लोक हे झऱ्यांच्या पाण्यावर अवलंबून आहेत. हिमालयीन प्रदेश, पश्चिम घाट (महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, केरळ, तमिळनाडू), पूर्व घाट (ओडिशा, आंध्र प्रदेश) आणि मध्य भारतातील (सातपुडा-विंध्य) दुर्गम भागांत झरे हा पाण्याचा प्राथमिक स्रोत आहे. येथील समुदायांना नद्या किंवा हिमनदीपासून पाणीपुरवठा करणे आर्थिकदृष्ट्या शक्य नसते. झरे केवळ पाण्याचा पुरवठाच करत नाहीत, तर ते नद्यांचे स्रोतही आहेत. पावसाळ्यात अनेक झऱ्यांचे पाणी नद्यांना मिळते. याशिवाय, झरे स्थानिक जैवविविधतेला आधार देतात.

सन २०१८मध्ये निती आयोगाने हिम ालयातील झऱ्यांच्या पुनरुज्जीवनाबाबतच्या अहवालात झऱ्यांचे मॅपिंग देशपातळीवर करण्याची गरज नोंदवली. त्यानुसार, जल संसाधन मंत्रालयाने मे २०२५मध्ये भारताची झऱ्यांची पहिली गणना सुरू केली आहे. त्या अंतर्गत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा ही नोडल एजन्सी आहे. देशभरातील झऱ्यांचे सर्वेक्षण, दस्तावेजीकरण आणि संवर्धनासाठी ही एजन्सी प्रयत्न करेल. या यंत्रणेबरोबरच या प्रकल्पासाठी स्थानिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे.

ग्रामीण आणि शहरी भागातील विसर्जित झऱ्यांची माहिती यंत्रणेकडे नोंदवली जाणे गरजेचे आहे. झऱ्यांचे संरक्षण हे जलसंधारणाच्या धोरणाचा भाग आहे. त्यामुळे, सरकारच्या पुढील जलनीतीत या लहान, पण महत्त्वाच्या जलस्रोतांना प्राधान्य मिळण्याची शक्यता आहे. झऱ्यांच्या संवर्धनासाठी स्थानिक पातळीवर जागरूकता निर्माण करणे, पारंपरिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि त्यांच्या पाण्याचा शाश्वत वापर सुनिश्चित करणे गरजेचे आहे.

झरे हे केवळ पाण्याचा स्रोत नव्हेत, तर भारताच्या जलसंस्कृतीचा अविभाज्य भाग आहेत. त्यांचे संरक्षण आणि पुनरुज्जीवन हे पाण्याच्या सुरक्षिततेसाठी अत्यंत गरजेचे आहे. कारण झरे पुनरुज्जीवित केल्यास पाण्याच्या संकटावर मात करण्यास मदत होऊ शकते.

पान १ वरून पुढे...

## समाज कल्याण...

दिला जातो. विशिष्ट गरजा असणाऱ्या मुला-मुलींसाठी वसतिगृहे: काही वसतिगृहे, विशेष गरजा असणाऱ्या मुला-मुलींसाठी (उदा. दिव्यांग) देखील उपलब्ध आहेत. वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे आणि विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. विविध उत्पन्न मर्यादा आणि इतर निकष संबंधित विभागाच्या माहितीनुसार तपासावे लागतात. ग्रामीण भागात एका वस्तीग्रहात ठराविक विद्यार्थी संख्या प्रमाणे राज्य शासन समाज कल्याण विभाग अनुदान ठरवत असतो. यामध्ये जेवण भत्ता राहणे व शैक्षणिक साहित्यसह कपडे आधी गोष्टींचा समावेश असतो अनेक ठिकाणी फक्त वस्तीग्रह नावालाच असल्याचे दिसून येत आहे. तर काही ठिकाणी अतिशय चांगल्या दर्जाचे निवासी वस्तीग्रही आहेत. मात्र शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानावर ही सर्व वस्तीग्रह सुरू असून शासन विद्यार्थी संख्येनुसार अनुदान प्रत्येक वर्षी देत असतो. गेल्या अनेक वर्षापासून बीड जिल्ह्यात शासनाचे अनुदान प्राप्त वस्तीग्रह अस्तित्वात आहेत या ठिकाणी विद्यार्थ्यांची संख्या किती व या ठिकाणी राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या किती यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत असून समाज कल्याण विभागाअंतर्गत असणाऱ्या या वस्तीग्रहावर वस्तीग्रह निरीक्षक म्हणून समाज कल्याण विभागाचा अधिकारी कार्यरत असतो मात्र अनेक वस्तीग्रहावर जाण्यासाठी संबंधित अधिकाऱ्याला वेळच नसल्याने प्रत्येक वर्षी मिळणाऱ्या अनुदानातून यांनाही काही लाभ होत आहे का ? बीड जिल्ह्यात ऊसतोड मजूर व मागासवर्गीय तसेच इतर मागासवर्गीय भटके विमुक्तांसाठी मोठ्या प्रमाणात वस्तीग्रे सुरू आहेत शासनाने विद्यार्थी घडवण्यासाठी मोठ्या प्रमाणात समाज कल्याण विभागाकडे आर्थिक तरतूद केलेली आहे या ठिकाणी निवासासाठी येणारे विद्यार्थ्यांना जेवण व राहण्याची उत्तम सोय आहे का शासनाने दिलेल्या दिशा निर्देशाप्रमाणे या विद्यार्थ्यांचे पालन पोषण होत आहे का प्रत्येक दिवशी ठरवलेले अन्नपदार्थ व पौष्टिक आहार विद्यार्थ्यांना दिला जात आहे का असे अनेक प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत असून शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानावर ताव मारत विद्यार्थी संख्या दाखवणाऱ्या बोगस वस्तीग्रहावर समाज कल्याण विभागाचे अधिकारी कारवाई करतील का ?

## सार्वजनिक बांधकाम...

ता. २२ रोजी हा प्रकार उघडकीस आला आहे. संबंधित कंत्राटदाराच्या सुपरवायझरला माहिती विचारायचा प्रयत्न केला असता, त्याने मुग गिळी भूमिका घेतली. दरम्यान, अजमेरा कन्स्ट्रक्शन च्या या कामाची शिवसेनेचे तालुका प्रमुख अजय दाभाडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली आहे. गेवराई तालुक्यातील चकलांबा, माटेगाव, खळेगाव मार्गे पांढरवाडी फाट्यापर्यन्त न्यूईटी अंतर्गत, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या देखरेखीत राज्य रस्ता काम सुरू आहे. या रस्त्याची कंत्राटदारांनी वाट लावली आहे. या प्रकल्पावर देखरेख करणाऱ्या सार्वजनिक बांधकाम

पान १ वरून पुढे...

विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित कंत्राटदार एजन्सीला बोगस काम ाचा परवानाच दिलाय. अशी ओरड सुरू आहे. त्यामुळे, सदरील रस्ता प्रकल्पाच्या कामाची चौकशी करावी, अशी मागणी शिवसेनेचे तालुका अध्यक्ष अजय भैय्या दाभाडे यांनी मुख्यमंत्र्यांना ई- मेल पाठवून केली आहे. विधानसभा निवडणुकीत लोक प्रतिनिधी व्यस्त असल्याचा फायदा, कंत्राटदाराने घेतलाय. १२२.४० कोटी रूपयांच्या रस्ता कामाचा दर्जा पूर्णपणे ढासळला आहे. बीड जिल्हयातील गेवराई तालुक्यात प्रथम जिल्हा मार्ग -१६ ते चकलांबा राजपिप्री-गेवराई रोहीतळ-जातेगाव सेलु - लोणाळा-मारफळा ते राष्ट्रीय महामार्ग २२२ रस्ता प्रथम जिल्हा मार्ग - २० किमी ०/०० ते ६४/०० मध्ये जवळपास ३० किलोमीटर अंतरावरचे रस्ता डांबरीकरणाचे काम सुरू आहे. या कामास २०२० - २०२१ मध्ये तांत्रिक मान्यता देण्यात आली. गेवराई तालुक्यातील चकलांबा येथून रस्ता कामाला सुरुवात करण्यात आली आहे. चकलांबा, माटेगाव मार्गे गेवराई आणि जातेगाव, सेलू, लोणाळा, मारफळा मार्गे होत असलेला हा राज्य रस्ता थेट राष्ट्रीय महामार्गाला जोडला जाणार आहे. ग्रामीण भागातील दळणवळणासाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा आहे. ग्रामीण भागातील रस्ते विकास गरजेचा असल्याने, हा रस्ता दर्जेदार व्हावा, अशी अपेक्षा होती. परंतू , सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांचे अभय मिळाल्याने नियम ,अटीला केराच्या टोपलीत ठेवून काम सुरू आहे. निकृष्ट कामामुळे रस्त्याला जागोजागो तडे गेले आहे. दुतर्फा असलेल्या ड्रेनेजचा दर्जा अत्यंत खराब आहे. सिमेंट, खडीचा वापर व्यवस्थित करण्यात आला नाही. नाली काम अनेक ठिकाणी ढासळले आहे. सिमेंट रोडची लेवल करण्यात आली नाही. डांबरीकरण करायच्या आधी व्यवस्थित खडीकरण करून, त्याची दबाई करण्यात आलेली नाही. अनेक ठिकाणी माती मिश्रित खडी वापरली आहे. कंत्राटदाराने अनेक ठिकाणी मनमानी केली आहे. रविवार ता. २२ रोजी पांढरवाडी ता. गेवराई परिसरात काम सुरू आहे. त्या ठिकाणी दुय्यम प्रतीची, थिकनेस नसलेली पॉलिथीन अंथरुण्यात आली होती. भंगारच्या दुकानातून काळे मेनकापड आणून, त्यावर वाळू , खडी, सिमेंट मिश्रित मटेरियल टाकले जात होते. पॉलिथीन फाटलेली होती. छायाचित्र काढण्या पुरती पॉलिथीन अंथरून, नंतर ती काढून घेण्यात येते. अशी तक्रार गावकऱ्यांनी केली. कामाचा दर्जा अंत्यत खराब आहे. त्यामुळे, या काम ाची चौकशी करण्याची गरज आहे. दरम्यान , ११२ कोटी रूपयाच्या बोगस कामाचा परवाना, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या भ्रष्ट अधिकाऱ्यांनी उस्मानाबादच्या अजमेरा कन्स्ट्रक्शन कंपनीला दिलाय का ? असा खडा सवाल उपस्थित केला जात आहे.

## शेतकऱ्यांना पीक...

शाळा घेऊन कानउघडणी केली. शिवसेना प्रदोत सुनिलजी प्रभू, प्रवक्त्या सुषमाताई अंधारे व संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव यांच्या आदेशानुसार आज शिवसैनीकांनी आपला मोर्चा बँके कडे वळवला. पीक कर्जासाठी आलेले अर्ज किती? मंजूर अर्ज किती? नामंजूर अर्ज

पान १ वरून पुढे...

किती? प्रलंबित अर्ज किती व प्रलंबाचे कारण काय? पीक कर्जाचे उद्धीष्ट किती? शेतकऱ्यांना सिबिल चे कारण सांगून किती शेतकऱ्यांचा अर्ज नामंजूर केला? या सह असंख्य प्रश्न उपस्थित करून शिवसैनिकांनी बँक अधिकाऱ्यांची शाळा घेतली. यावेळी महिला जिल्हा संघटक मीरा ताई नवले, जिल्हा समन्वयक संजय महाद्वार, उपजिल्हाप्रमुख आशिष मस्के, उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महुवाले, उपजिल्हाप्रमुख हनुमान जगताप, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे,कामगार सेना रवी वाघमारे,नवनाथ प्रभाळे, सरपंच प्रदीप कोटुळे,सतीशसिंह परदेशी, गणेश लोणकर, मच्छिंद्र काळे, सतीश मस्के, नंदकुमार घोगरे,शेख मुजमिल,रमेश नवले,विशाल तांबे व इतर शिवसैनिक उपस्थित होते.

## धामणगाव येथे...

(दि.२२) रोजी रात्रीच्या सुमारास वाळूने भरलेला टिप्पर असल्याची गोपनीय माहिती अंभोरा पोलिसांना मिळताच सापळा रचून कलम ३०३ (२) नुसार पोलीस अंमलदार बालाजी होळंबे यांच्या फिर्यादीवरून आरोपी विलास नाना बोरूडे ता. पाथर्डी याच्यावर गुन्हा दाखल करत अटक करून त्याच्यावर कारवाई करण्यात आली. हि कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत,अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बाळकृष्ण हनपुडे, यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे,पोलीस हवालदार बाबासाहेब गर्जे,पोलीस अमलदार शिवदास केदार, बालाजी होळंबे,चालक पठाण यांनी केली आहे.सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस हवालदार बाबासाहेब गर्जे हे करीत आहेत.

## बीड पोलिसांची...

पांडकर, शितलकुमार बल्लाळ, सहा. पोलीस निरीक्षक बाबा राठोड आणि पोलिस अंमलदार बालाजी मुळे यांच्या उपस्थितीत सदर मुद्देमाल डॉ. लक्ष्मीकांत तांदळे यांना सन्मानपूर्वक परत करण्यात आला. या यशस्वी कार्यवाहीबद्दल डॉ. तांदळे यांनी बीड पोलिसांचे आभार मानले असून नागरिकांमध्ये पोलिसांबाबत विश्वास दृढ झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या मार्गदर्शनाखाली बीड पोलिसांचे हे कौतुकास्पद कार्य जनतेत एक विश्वासार्हतेचा निर्धार निर्माण करणारे ठरले आहे.

## शेतकऱ्यांना पीक...

शेतकऱ्यांच्या खात्याला होल्ड का केले आहे. सिबिल का मागितले जाते असे अनेक प्रश्न विचारले व सविस्तर माहिती घेतली.

यावेळी बोलताना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर म्हणाले की, शेतकऱ्यांच्या कुठल्याही कामासाठी तुम्ही अडवणुक करु नका जर शेतकऱ्यांना आडवले तर शिवसेना बीड जिल्ह्याच्या वतीने आम्ही बँकांचे कामकाज होऊ देणार नाहीत आणि पीक कर्ज देण्यास नकार दिल्यास शाखेत जाऊन शाखा अधिकाऱ्यांना काळे फासु असा इशारा

पान १ वरून पुढे...

दिला. या आंदोलनाला जिल्हा सहसचिव श्रीकृष्ण गायके, युवा सेना तालुका अधिकारी बारीकराव येवले, उप तालुकाप्रमुख अशोक सगळे, उप तालुकाप्रमुख रामनारायण जाधव, तालुका सचिव नंदकुमार येवले, युवानेते मुकेश घुमरे, भरत खरात, विशाल पटेकर, महेश लांडगे, ज्ञानेश्वर सिंघन , राजेंद्र भोसले, सखाराम बेंगडे, कृष्णा तांदळे, रामा कदम, बाबु कुंटे, चंदू बजगुडे, किशोर गायके, समाधान वरेकर, बबलू तिपाले, बबनराव काकडे, प्रविण पवार यांच्यासह शेतकरी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भारतीय स्टेट बँक ...

कारणेसाठी ई-लिलाव नोटीस प्रकाशीत केल्यानंतर शहा मोसीन नयुम शहा, नय्युम शहा हाजी पाशा शहा व मोहम्मद अकबर अब्दुल मज्जीद कच्छी यांनी ते नमुद मालमत्तेचे प्रमाणीक खरेदीदार आहेत, बँकेकडे कर्जदार व जामीनदार यांचे ईतर मालमत्ता लिलाव काढणेकरिता उपलब्ध आहेत, मा. जिल्हादंदाधिकारी यांनी बँकेस सदर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा दिलेला नाही या व ईतर मुद्यावर सदर मालमत्तेचे ई-लिलाब विक्री प्रक्रियाला दिवाणी न्यायालय माजलगाव येथे दावा दाखल करुन अंतरीम मनाई आदेशाची मागणी केली होती. सदर प्रकरणाची सुनावणी माजलगाव येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश श्री.जी.एस. खुपसे यांचेसमोर झाली असता न्यायालयाने दिनांक २०.०६.२०२५ रोजी पुढील आदेशापर्यंत मौजे धनगरवाडी ता. माजलगाव जि. बीड येथील गट क्र. ६१ मधील ०० है. ८१ आर जमीन विक्री लिलावास अंतरीम तुर्तातुर्त मनाई आदेश दिला आहे. सदर प्रकरणात ॲड. शरद एस. सोळंके यांचे मार्गदर्शनात ॲड. व्हि.बी. कदम यांनी युक्तीवाद केला.

## पाटोदा महावितरण...

तक्रार नोंदवली असून त्याला वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, धक्कादायक बाब म्हणजे रुग्णालयात जाताना परत भरचौकात आरोपीने पुन्हा एकदा त्या कर्मचाऱ्यावर हल्ला केला.या घटनेमुळे संतप्त झालेल्या महावितरण कर्मचाऱ्यांनी पाटोदा शहराच्या मुख्य चौकात रस्ता रोको आंदोलन सुरू केले. आरोपीला तात्काळ अटक करा, महावितरण कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची हमी द्या, अशा घोषणा देत कर्मचाऱ्यांनी आपला रोष व्यक्त केला.यावेळी महावितरण संघटनेचे पदाधिकारी, कर्मचाऱ्यांचे सहकारी आणि स्थानिक नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी पोलिस प्रशासनाकडे मागणी केली की, हल्लेखोरावर कठोर कारवाई व्हावी आणि भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी कर्मचारी सुरक्षेचे ठोस उपाय योजावेत.पोलीस प्रशासनाने आंदोलकांशी संवाद साधून कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. मात्र, आरोपीला लवकरात लवकर अटक न झाल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महावितरण कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

पान ४ वरून पुढे...

## प्रस्थापितांना नाकारल्यामुळे...

वाहणाऱ्या या आंबेडकरी योद्धाने चळवळी सोबत गद्दारी करण्यास ठाम नकार दिला.ज्याचा परिणाम बाबुराव पोटभरे गेल्या ३५ वर्षापासून आमदारकी पासून दूर राहिले आहेत.परंतु असे असले तरी त्यांचा रुबाब मात्र आमदार खासदार मंत्र्याला लाजवेल असाच आहे.ज्यात ते खूप सम ाधानी असल्याचे त्यांच्या बोलण्यातून नेहमी दिसून येते.

## शहरातील समस्यांवर...

ही बंद पडलेली कामे तातडीने पुनरुज्जिवीत करण्याची मागणी यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली. तसेच नगर रोडवरील जिल्हाधिकारी कार्यालय आणि न्यायालयात जाण्यासाठी नागरिकांना रस्ता दुभाजक खुला करण्याची गरज व्यक्त केली. यामुळे नागरिकांना होणारा त्रास कमी होईल, असे मत आ. क्षीरसागर यांनी मांडले.याशिवाय, अमृत अटल जल योजनेंतर्गत नव्याने सुरू करण्यात आलेल्या पाण्याच्या टाकीचे अनेक नागरिकांना अद्याप कनेक्शन मिळालेले नाहीत. ही कनेक्शन तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने त्वरित कार्यवाही करावी, अशी सूचना बैठकीत करण्यात आली. यासोबतच, बीड शहरात सुरू असलेल्या स्वच्छता मोहिमेला प्रशासनाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची खंत व्यक्त करत, यंत्रणांनी अधिक सक्रियपणे काम करण्याचे आवाहन आ. क्षीरसागर यांनी केले. दरम्यान जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सर्व मुद्द्यांची गांभीर्याने दखल घेत संबंधित विभागांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम यांच्यासह बीड नगरपरिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि इतर संबंधित विभागाचे

पान ४ वरून पुढे...

अधिकारी उपस्थित होते.

## महायुतीमुळे भटक्या...

आयुष्यमान आरोग्य कार्ड, जन्मदाखला इ.प्रमाणपत्र भटकंती करत असल्याने अडचणी निर्माण होत होत्या, कोणतेही शासकीय योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रमाणपत्र आवश्यक होते पंरतु मिळत नव्हते यासाठी वेळोवेळी आंदोलने, मोर्चा, उपोषण, निवेदन देणं यासारखे मार्ग अवलंबून न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू होते. आता राज्य सरकारने राजे उमाजी नाईक महाराजस्व अभियान व छत्रपती शिवाजी महाराज महराजस्व अभियान अंतर्गत कागदपत्रे सुलभपणे वितरण करण्यासाठी राज्य सरकारने आदेशित केले आहे. यामुळेच भटक्या -विमुक्त जाती जमातींच्या वस्ती,वाडे,पाडे, तांडे, ग्रामीण व शहरी भागात जाऊन वरील प्रमाणपत्र काढण्यासाठी शासकीय स्तरावर अभियान राबविण्यात येत आहेत.या आवश्यक प्रमाणपत्र मिळाल्यावर केंद्र व राज्य सरकारच्या या समुहासाठी शासकीय योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहोत,तसे पाठपुरावा करुन हया घटकांच्या उत्थानासाठी लोकनेत्या ना.पंकजाताई साहेब मुंडे, दबंग मा.खा.डॉ.प्रीतमताई साहेब मुंडे,भाजपा भटक्या -विमुक्त आघाडी प्रदेश अध्यक्ष राहुल केंद्रे व भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान जिल्हाभरात राबविण्यासाठी भाजपा भटक्या -विमुक्त आघाडी बीड जिल्हाध्यक्ष या जबाबदारीने प्रयत्नशील राहणार आहोत. यावेळी भाजपा भटक्या -विमुक्त आघाडी बीड जिल्हाध्यक्ष मी डॉ.लक्ष्मण जाधव या जबाबदारीने उपस्थित राहून मनोगत व्यक्त केले व प्रशासकीय अधिकारी यांना या समुहातील अनेक मागण्या पूर्ण करण्यासाठी आवाहन करण्यात आले.

पान ४ वरून पुढे...

यावेळी अप्पर जिल्हाधिकारी धार्मिक साहेब, तहसीलदार शेळके साहेब, नायब तहसीलदार, महसूल विभाग अधिकारी, मंडळ अधिकारी,तलाठी, ग्रामसेवक, आरोग्य विभाग अधिकारी, नगरपरिषद अधिकारी इ.उपस्थित होते. यावेळी प्रस्तावित भटक्या -विमुक्त हक्क परीषद जिल्हा संयोजक ओमप्रकाश गिरी यांनी केले, यावेळी भटक्या विमुक्त हक्क परीषद म राठवाडा विभाग संयोजक जोगी सर, डॉ.सुभाष जोशी सर, डॉ.पैठणकर सर,भाजपा नेते भूषण पवार,मिराताई गांधले, शिवसेना शिंदे गट नेते मनोज चव्हाण, राष्ट्रवादी युवा नेते अमर ढोणे, मसणजोगी समाज अध्यक्ष हनुमंत मोरे आदी जण उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाला प्रमाणपत्र वितरण हस्तगत करण्यासाठी भटक्या -विमुक्त जाती जमातीतील अनेक गरजवंत उपस्थित होते.

## शासनाचा मिळालेला....

फेटा शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पुढे बोलताना मेडे म्हणाले की राज्यामध्ये आमचा छोटा समाज असल्यामुळे या समाजावर अन्याय अत्याचाराच्या घटना घडत होत्या त्यांना न्याय मिळत नव्हता म्हणून मी समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी अखिल भारतीय कैकाडी महासंघाची स्थापना केली आणि या संघटनेच्या माध्यम ातून राज्यभरामध्ये समाज बांधवांना न्याय मिळवून दिलेला आहे याचा मला अभिमान असून राज्यातील समाज बांधवांनीही माझ्यावर विश्वास टाकून संघटना मजबूत करण्याचं काम केलं आहे त्यामुळेच मी केलेल्या कामाची दखल राज्य सरकारने घेऊन ईश्वर रत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने महाराष्ट्र शासनाचा हा जो पुरस्कार मिळाला आहे तो पुरस्कार माझ्या जरी नावाने असला तरी तो तमाम समाज बांधवांचा

पान ४ वरून पुढे...

पुरस्कार असल्याचे मत मेढे यांनी व्यक्त केले आहे आगामी काळात सम ाजाच्या प्रश्नावर सतत जागरूक राहून आवाज उठवण्याचे काम मी करणार आहे असा विश्वास त्यांनी यावेळी दिला यावेळी राजेश घोडे तुकाराम येवले ज्ञानेश्वर मेंडके गोरख मेंडके आदींनी मनोगत व्यक्त केली या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कैकाडी महासंघाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण गायकवाड यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार पंडित मेंडके सर यांनी मांडले हा कार्यक्रम विशेष स्वीकारण्यासाठी अखिल भारतीय कैकाडी महासंघाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले या कार्यक्रमास विलास नेमाने राजेश मेंडके बाबासाहेब जाधव नवनाथ गायकवाड बंडू गायकवाड नारायण मेंडके शिवाजी गायकवाड अंकुश मेंडके यांच्यासह बीड जिल्ह्यातून पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## 'आरोग्याची वारी...

या सर्व आरोग्य विषयक जनजागृती आणि मदतकार्यकरीता आरोग्य ची वारी पंढरीचा दारी, अंतर्गत केज तालुक्यातील बोरीसावर गाव येथर श्री गजानन महाराज यांची पायी दिंडी पालखी चें आगमन झाले. त्यावेळी आरोग्य विभाग मार्फत सर्व संत वारकरी यांचे आरोग्य विषयक विचारणा व प्राथमिक उपचार केले. तसेच आरोग्य विषयक जनजागृती कारणासाठी चें फलक लावण्यात आले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी केज तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अशोक गवळी ,वैद्यकिय अधिकारी डॉ.मोमीन , समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.कावळे , आरोग्य सहाय्यक श्री.कदम,श्री.वैद्य, श्री.शिंदे , सर्व आरोग्य सेवक, आरोग्य सेविका श्रीम ती.चवरे आदींनी वारकऱ्यांची आरोग्य तपासणी मोहिम राबविण्यासाठी परिश्रम घेतले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## रान डुक्करांच्या हल्ल्यात शेतकऱ्याचा मृत्यू



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

तालुक्यात रानडुक्करांच्या त्रासाला शेतकरी वैतागलेले आसतानाच एक अंत्यत दुखत व वाईट घटना घडली आहे. रूई धारूर येथील शेतकरी प्रकाश गोविंदराव तिडके वय ५७ वर्षे यांचा डुक्करांच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे. या बाबत सविस्तर घटना अशी की, रुई धारूर येथील प्रतिष्ठित व सांप्रदायिक क्षेत्रातील व्यक्तीमत्व प्रकाश गोविंदराव तिडके हे सकाळी पाच वाजता आपल्या घरून शेतात दुध आणायला मोटारसायकल वरून जात आसताना गावाजवळील ओढ्याजवळ चार ते पाच डुक्करांच्या कळपाने अचानक त्यांच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात ते रोडवर पडले त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना तात्काळ लातूर येथील सह्याद्री हॉस्पीटल येथे दाखल केले परंतू डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. रानडुक्करांच्या हल्ल्याने एक निष्पाप शेतकऱ्यांचा नाहक जीव गेला या मुळे गावात व परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. यापूर्वी पण या मार्गावर एक घटणा घडलेली आहे. वनविभागाचे तालुक्यातील रानडुक्करांचा बंदोबस्त करावा अशी जनतेची मागणी आहे.

### बार्शी नाक्यावर आषाढी वारीला जाणाऱ्या वारकऱ्यासाठी फराळ, नाष्टा व चहा वाटप सुरुवात...

# वारकऱ्याची सेवा हिच खरी ईश्वर सेवा, वारकऱ्यांनी फराळाचा लाभ घ्यावा: लक्ष्मण विटकर



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील बार्शी नाका भागातील माजी नगरसेवक लक्षमन विटकर यांनी प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी बार्शी नाका येथे वारकऱ्यांसाठी फराळ नाष्टा व चहाची सोय केली आहे. आषाढीवारी निमित्त भाविक व वारकरी पंढरपूरला पायी जाणाऱ्या सर्व वारकऱ्याच्या दिंडीस सुरुवात झाली असल्याने शहरातील बार्शी नाका येथे जेवण्याची व नाष्टा, फराळ व चहा ची सोय करण्यात आली असून वारकऱ्यांची सेवा करण्याची सात वर्षे पूर्ण झाले आहेत. याचे उद्घाटन गोरक्षनाथ टेकडीचे महंत नवनाथ महाराज यांनच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास भैया गिराम, युवा नेते पप्पू ढोले, गणेश जाधव, रावसाहेब ढोले, कचरू मामा गलधर, किसनराव शेळके, मच्छिंद्र वाणी, सचिन पवार, राम शिंदे, उत्तरेश्वर पवार कल्याण ढोले, गणेश गुरुड, भूषण सुरवसे संदीप नन्नवरे, रामा गायकवाड, साथीराम ढोले सुशील कांबळे, माझी पंचायत समिती सदस्य नाथ परबाळे, पंचायत समिती सदस्य माजी गोंडी बनवले, माजी आमदार लक्ष्मण पवार यांचे पीए बाबुराव खाडे, कोंडीराम भांडवले, अमोल अहिरे, दीपक पवार शहादेव शिंदे सह बार्शी नाका भागातील नागरिक उपस्थित होते.

या वेळी माजी नगरसेवक विटकर यांनी वारकऱ्यांनी फराळ, नाष्ट करूनच पुढे जावे अशी विनंती बार्शी नाका मित्र मंडळा कडून करण्यात आली.

## रस्ते, स्वच्छता व क्रॉसिंग सुविधांबाबत नागरिकांचा संताप; 30 जून रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलनाचा इशारा

**सय्यद जावेद अली अन्सार अली यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे मागण्या सादर केल्या**



**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील रस्त्यांची दयनीय अवस्था, स्वच्छतेचा अभाव आणि मुख्य प्रशासकीय कार्यालयांपर्यंत जाण्यासाठी रस्ता क्रॉसिंगच्या कमतरतेवरून संतप्त नागरिकांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करत ३० जून रोजी धरणे आंदोलनाचा इशारा दिला आहे. सय्यद जावेद अली अन्सार अली (रा. काझीनगर, बालेपीर नगर रोड, बीड) यांनी जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते राजुरी वेस, बलभीम चौक ते धोंडीपुरा आणि माळीवेस चौक या संपूर्ण रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले असून नागरिकांना मानसिक, शारीरिक आणि आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे अनेक वाहनचालकांना मणक्याचे व कमरेचे आजार होत आहेत.

सर्व मागण्या लवकरात लवकर पूर्ण न झाल्यास दि. ३० जून २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने धरणे आंदोलन करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा निवेदनात देण्यात आला आहे. तसेच नागरिकांच्या संतप्त भावनेचा निषेध म्हणून न.प. बीड कार्यालयासमोरील खड्ड्यांत बेशरमची झाडे लावण्यात येतील, असा इशाराही निवेदनात नमूद करण्यात आला आहे.

## लिंबागणेश जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत योगदिनानिमित्त विद्यार्थ्यांना योगासनाचे धडे



**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत दि.२१ आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त शालेय विद्यार्थ्यांना योगासनाचे धडे देण्यात आले. मानसिक आरोग्य त्याबरोबरच शारीरिक स्वास्थ्य देखील महत्वाचे असल्याची शिकवण दिली. शाळेच्या निसर्गरम्य प्रांगणात व प्रसन्न वातावरणात इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना ताडासन, वज्रासन, भुजंगासन, पश्चिमोत्तानासन, त्रिकोणासन, पवनमुक्तासन, सुर्य नमस्कार आदी योगासने करण्यात आली. विद्यार्थ्यांना अनुलोम -विलोम, कपाल भाती, भ्रामरी, भस्त्रीका, नाडी शोधन, प्राणायाम आदींची माहिती देण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक आबासाहेब हांगे, सहशिक्षक आगम एस.बी., चौरे बी.बी. सहशिक्षिका श्रीमती माधुरी कुलकर्णी, आदी शिक्षकवृंद उपस्थित होते. योग प्रशिक्षण व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक अमर पुरी यांनी केले.



*शासकीय रुग्णालय बीड येथे बुधवार रोजी झालेल्या प्रकरणासाठी व बीड जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात डॉक्टर गैरहजर असून सर्वसाधारण जनतेची गैरसोय व रुग्णांच्या जीवाशी खेळ होत असून इतर काही मागण्यांसाठी धरणे आंदोलन करण्यात आले होते त्यासाठी सिविल सर्जन राऊत साहेब यांनी आश्वासन दिले आहे चार दिवसांमध्ये कमिटी स्थापन करून झालेल्या प्रकरणासंबंधी तेथील स्टाफ व डॉक्टर्स यांची चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात येईल व त्या डॉक्टरांना निलंबित करण्यात येईल त्यामुळे आंदोलन चौकशी होईपर्यंत आपण स्थगित करत आहोत चौकशी झाल्याच्या नंतर आपल्या मागण्या मान्य नाही झाल्या व कायदेशीर कारवाई नाही केली तर ३०/०६/२०२५ रोजी शासकीय रुग्णालय परिसर व बीड शहरात जे काही प्रकरण होईल त्याला शासकीय रुग्णालय बीड येथील सीएस राऊत साहेब व त्या प्रकरणा संबंधित जे काही स्टाफ डॉक्टर्स असतील हे जबाबदार राहतील. असा इशारा देण्यात आला.*

## योग हा सुखी व समृद्ध तथा निरोगी जीवन जगण्याचा राजमार्ग आहे- डॉ ज्ञानोबा दराडे



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

देशभरात मागच्या सन २०१४ पासून २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येत आहे. या योगदिनानिमित्त अंबाजोगाई येथेही विविध ठिकाणी हा योगदिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. शहराच्या स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात देखील तीन दिवशीय योग शिबिराचे आयोजन केले होते. या तीन दिवसीय

योग शिबिरात योग प्रशिक्षक म्हणून नेत्र विभाग प्रमुख डॉ ज्ञानोबा दराडे यांनी अतिशय उत्तम अशी कामगिरी बजावली. यावेळी त्यांनी योग साधनेबाबत मार्गदर्शन करतांना स्पस्ट केले की योग हा सुखी समृद्ध तथा निरोगी जीवन जगण्याचा राजमार्ग आहे, त्यामुळे नियमितपणे सर्वांनी किमान ४५मिनिट योगसाधना करण्याचे आवाहन डॉ दराडे यांनी केले. या शिबिरात स्वा रा ती चे अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे यांच्यासह अनेक डॉक्टर उपस्थित होते.

भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या वतीने मागील ११ वर्षापासून योगदिन साजरा करण्यात येत आहे. स्वा रा तिच्या योगशिबिरात अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे यांनी देखील उपस्थित सर्वांना प्राणायाम व योगसाधनेचे महत्त्व विषद केले. त्याबरोबरच योगाचे काही प्रात्यक्षिक देखील करून दाखवले. आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून स्वा रा ती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टर्स, वैद्यकीय विद्यार्थी, अधिपरिचरिका तथा कर्मचारी बांधवांसाठी आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय योगशिबिराच्या दरम्यान योग प्रशिक्षक डॉ ज्ञानोबा दराडे यांनी विविध प्रकारचे योगासने, प्राणायाम व ध्यान यांचे प्रशिक्षण दिले. तसेच योगासने केल्यामुळे शरीरातील सर्व स्नायू, हाडे व सांधे मजबूत होतात. संधिवातासारखे आजारसुद्धा कमी होऊन शरीराची रोगप्रतिकार शक्ती वाढण्यास मदत होते. त्याचबरोबर प्राणायाम व ध्यान केल्यामुळे श्वसन संस्था याचे कार्य सुधारून हृदय सुद्धा निरोगी राहते असे डॉ ज्ञानोबा दराडे यांनी याप्रसंगी सांगितले.

**दैनिक मराठवाडा पत्र** दि. २३/०६/२०२५

**टी सी हरवला आहे.**

अनिल शिवनाथ पुरी या नावाचा इयत्ता १२ वी पासचा टी. सी. तळेगाव ते बीड प्रवासात हरवला आहे. कोणाला सापडल्यास संपर्क: ९६०४०९८३८४

## भारतीय स्टेट बँक दिनानिमित्त आज एसबीआय वडवणी शाखेच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन

**वडवणी । प्रतिनिधी**

प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही १ जुलै हा बँक दिन म्हणून सर्व भारतामध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत असतो. यानिमित्ताने देशभरात बँक प्रशासन व कर्मचाऱ्यांच्या वतीने विविध सामाजिक व आर्थिक व सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात.

याचनिमित्ताने या वर्षीदेखील विविध उपक्रम राबवून बँक दिन साजरा करणार असल्याचे वडवणी येथील शाखेचे व्यवस्थापक यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले. याबद्दल सविस्तर माहिती अशी की, १ जुलै हा दिन राष्ट्रीय बँक दिन म्हणून सर्वत्र साजरा करण्यात येत असतो याच अनुषंगाने स्टेट बँक ऑफ इंडिया वडवणी शाखेच्या वतीने भव्य असे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे रक्तदान शिबीर दि.२४ जून वार मंगळवार रोजी वडवणी येथील एसबीआय शाखेमध्ये संपन्न होणार आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून देशातील नागरिकांनी आपले स्वास्थ्य उत्तम ठेवण्यासाठी नेहमित व्यायामबरोबर रक्तदान करणे आवश्यक आहे. या रक्तदान शिबिराला तालुक्यातील ग्राहक, शेतकरी, नागरिक, कर्मचारी व व्यापारी बांधवांना रक्तदान करण्याचे आवाहन बँकेचे व्यवस्थापक यांनी केले आहे.

## आ.सुरेश धस यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्याचा सत्कार



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी मतदारसंघातील शैक्षणिक व विविध क्षेत्रांत आपल्या कर्तुत्वाच्या जोरावर जिद्द आणि चिकाटी दाखवत भरारी घेऊन यश संपादन करत आपापल्या क्षेत्रात यशस्वी झालेल्या विद्यार्थी व पालक यांचा आमदार सुरेश धस यांनी आष्टी येथे अद्वेतचंद्र निवासस्थानी सत्कार करत अभिनंदन केले. यामध्ये आष्टी तालुक्यातील म्हसोबावाडी येथील विशाल शेकडे या युवकाची आर्मी लेफ्टनंट या पदी नियुक्ती झाले. पाटसरा येथील राहुल ज्ञानदेव सांगळे यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये दुय्यम अभियंता या पदावर नियुक्ती झाले. शिरूर तालुक्यातील वारणी येथील जयेश सुभाष केदार याला (५४७ गुण), संकेत सोमनाथ केदार (५२४ गुण), प्रमोद सुरेश डोंगरे (५२० गुण) या विद्यार्थ्यांनी NEET परीक्षेत यश संपादन करून ते चइइड साठी पात्र झालेल्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा आष्टी मतदारसंघाचे आ.सुरेश धस यांनी सत्कार करून अभिनंदन केले. त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी सभापती रमजान तांबोळी, सभापती बाळासाहेब केदार, एन.टी.गर्जे भाऊ, चेअरमन आदिनाथ सानप, रंगनाथ धोंडे, बाळू शेठ मेहेर, रामशेठ मधूरकर, आत्माराम फुंदे, प्रशांत गर्जे, राहुल गर्जे, यांच्यासह पालक ,नागरिक आदी उपस्थित होते.

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती ए. बी. निवारे ११ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज ९३९/२०२५**

**सुनिता व ईतर विरुध्द निरंक**

अर्जदार :- (१) सुनिता अशोक झोडगे, वय ४२ वर्ष, धंदा घरकाम, रा. कानडी घाट, ता. जि. बीड
(२) अमोल अशोक झोडगे, वय २८ वर्ष, धंदा शेती, रा. कानडीघाट, ता. जि. बीड
(३) जनाबाई रामभाउ झोडगे, वय ७२ वर्ष, धंदा घरकाम रा. कानडीघाट, ता. जि. बीड

विरुद निरंक

मागणी अर्ज :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात **मयत अशोक रामभाउ झोडगे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत अशोक रामभाउ झोडगे यांचा मृत्यु दि. २४/०५/२०२५ रोजी विवेकानंद हॉस्पीटल, ता. जि. बीड येथे झाला आहे. अर्जदारक. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा तर अर्जदार क्र. ३ ही मयताची आई आहे. मयतास मुलगी नाही.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत अशोक रामभाउ झोडगे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २० माहे जून २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिश दिले.

**सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २९ जुलै २०२५.**

(ॲड. एस बी नांदे)

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

शिक्का

**जाहीर प्रगटन**

**मा. श्री. मा. ये. वाघ ५ वे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ९३३/२०२५**

**सत्यनारायण व ईतर वि. निरक**

ज्याअर्थी कृतवर्मा बापूराव खेत्रे, हे दिनांक २९.११.२०१५ रोजी विप्र नगर, बीड ता. जि. बीड येथे व भिमाबाई प्र. कृतवर्मा खेत्रे या दिनांक १४.०४.२०२५ रोजी विप्र नगर, बीड ता. जि. बीड येथे मयत झालेल्या आहेत त्याअर्थी,

१. सत्यनारायण पि. कृतवर्मा खेत्रे, वय ५० वर्षे, धंदा नौकरी रा. सुभद्रा निवास, विप्र नगर, ब्राम्हणवाडी, बीड ता. जि. बीड

२. दिगंबर पि. कृतवर्मा खेत्रे, वय ४७ वर्षे, धंदा शेती रा. विप्र नगर, बामनवाडी, बीड ता. जि. बीड

३. विठ्ठल पि. कृतवर्मा खेत्रे, वय ४५ वर्षे, धंदा- शैली रा. सुभद्रा निवास, विप्र नगर, ब्राम्हणवाडी, बीड ता. जि. बीड

अर्जदार क्र. १ ते ३ हे मयतांची मुले आहेत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख ३०/०७/२०२५ ही आहे.**

आज दिनांक १९/०६/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

(ॲड. एम. डी. धांडे यांचे मार्फत)

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
अधीक्षक
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

(स्वाक्षरीत)
क. लिपीक

शिक्का

## कर्जाचे हापत्यापोटी वाहन जप्त केल्यास चोरीचा गुन्हा ठरत नाही, औरंगाबाद खंडपीठकडुन चोरीचा गुन्हा रद्द



ॲड शरद सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

कर्जाच्या हप्त्यापोटी वाहन जप्ती केल्यास चोरीचा गुन्हा ठरत नाही असे सांगत दाखल झालेला चोरीचा गुन्हा औरंगाबाद खंडपीठाकडून रद्द करण्यात आला आहे.

याबाबत असे की, जय महेश मल्टीस्टेट व्हिकल कंपनीचे कार्यकारी संचालक कैलास सारडा यांचेविरुध्द ग्राहक ज्ञानेश्वर राम किसन चव्हाण याने कंपनीमार्फत खरेदी केलेली चार चाकी गाडी एम. एच. २५ आर १९९२ ही कंपनीने जप्त केली असता माजलगाव शहर पोलीसात दिनांक २६.०९.२०२४ रोजी सदरचे वाहन त्याचे घरासमोर लावलेले असतांना व त्याची पत्नी घरी एकटी असतांना चोरीस गेले आहे व सदर वाहन कैलास सारडा यांनी चोरुन घेवुन गेल्याचा संशय आहे, अशी फिर्याद दाखल केली होती. त्यावरुन कैलास सारडा यांचेविरुध्द माजलगाव शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.३७२/२०२४, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहीताअंतर्गत गुन्हा दाखल झाला होता. सदर चारचाकी गाडी जय महेश मल्टीस्टेट व्हिकल कंपनीकडुन कर्जाने घेतलेली होती व त्यासाठी गाडी हायपोथिकेट केलेली असल्याने व सदर कर्जाचे हाप्ते ग्राहक ज्ञानेश्वर चव्हाण याने नियमीत परत फेड न केल्याने नियमानुसार जप्त केली असल्याने सदरचा चोरीचा गुन्हा चुकीच्या पध्दतीने दाखल केला असल्याचे कथन करुन गुन्हा रद्द व्हावा यासाठी कैलास सारडा यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे ॲड. शरद एस. सोळंके यांचेमार्फत फौजदारी अर्ज क्रमाक़ ४७८२/२०२४ नुसार प्रकरण दाखल केले होते. सदर प्रकरणाची सुनावणी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे मा. न्यायमुर्ती विभा कनकनवाडी मॅडम व मा. न्यायमुर्ती संजय देशमुख साहेब यांचेसमोर झाली असता मा. उच्च न्यायलयाने सदर गुन्ह्यात चोरीस गेलेले वाहन कंपनीकडे हायपोथीकेट केलेले असल्याने कंपनीचे कार्यकारी संचालक यांचेविरुध्द चोरीचा गुन्हा दाखल होवु शकत नसल्याचे निरीक्षण नोंदवुन रद्द केला आहे. सदर प्रकरणात अर्जदारांचे वतीने ॲड. शरद एस. सोळंके व ॲड. महेश काळे यांनी काम पाहिले. सरकारी पक्षाचे बतीने ॲड. आर.पी. गौर यांनी काम पाहिले.

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
मंगळवार, दि.२४ जून २०२५ पान ४



*बीड तालुक्यातील रामगडावरून पंढरपूर कडे आज पालखी मार्गस्थ झाली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम गिराम व राष्ट्रवादी चे जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांनी महंत योगीराज महाराजांचा सत्कार करून आशीर्वाद घेतले, यावेळी माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे, सतीश परदेशीं सह आदी.*

# पाटोद्यात गुन्हेगारीचा कळस आधी महावितरण कर्मचाऱ्याला मारहाण, नंतर कार्यालयाची तोडफोड



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरात गुन्हेगारीला ऊत आला असून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

आज दुपारी महावितरण कार्यालयात घडलेली धक्कादायक घटना संपूर्ण शहराला हादरवणारी ठरली. एका कर्मचाऱ्यावर भरदिवसा कार्यालयात मारहाण करण्यात आली आणि त्यानंतर आरोपीनेच कार्यालयात घुसून मोठ्या प्रमाणात कार्यालयाची तोडफोड केली. प्राथमिक माहितीनुसार,बिलासंदर्भात सुरू असलेल्या वादातून एका गुत्तेदाराने महावितरण कर्मचाऱ्याशी वाद घालून त्याच्यावर अचानक हल्ला चढवला. यानंतर संबंधित गुत्तेदाराने संतापाच्या भरात कार्यालयातील फर्निचर, संगणक, फायली व अन्य कागदपत्रांची नासधूस केली. या तोडफोडीत महावितरणच्या शासकीय संपत्तीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.घटनेनंतर महावितरण कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून कार्यालयात काही काळ कामकाज ठप्प झाले. मारहाण झालेल्या कर्मचाऱ्याला तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्याची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती सूत्रांनी दिली.दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पाटोदा पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणली असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या घटनेमुळे शासकीय कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

## प्रस्थापितांना नाकारल्यामुळे आमदारकी, मंत्रीपदापासून राहिले दुर

**माजलगाव । प्रतिनिधी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून सामाजिक चळवळीसाठी बाबुराव पोटभरे यांनी आपले जीवन वाहिले आहे. गेल्या पस्तीस वर्षात समाजकारण राजकारण करताना सत्तेचा मार्ग सोपा करण्याच्या अनेक संधी त्यांच्यासमोर आल्या होत्या. परंतु यासाठी त्यांना आंबेडकरी चळवळीची बेईमानी करावी अशी अट प्रस्थापितांकडून लादण्यात आली होती.ही अट त्यांनी स्वीकारली असती



तर सुरुवातीच्या काळातच ते आमदार झाले असते.आणि त्यांच्या कामाची स्टाईल पाहता कोणताही पक्ष त्यांना आपल्या मंत्रिमंडळात स्थान दिले असते. परंतु दलित पीडित वंचित बहुजन समाजाच्या न्यायी लढ्यासाठी स्वतःच जीवन चळवळीस

▶▶ उर्वरित पान २ वर

## शहरातील समस्यांवर आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक

### भुयारी गटार, नगर रोडचे डिव्हायडर, नळ कनेक्शन बाबत झाली चर्चा

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील अनेक म हत्त्वाच्या समस्यांवर उपाययोजना करण्यासाठी सोमवारी (दि.२३) रोजी आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकार यांच्या दालनात बैठक घेतली. या बैठकीत बीड शहरातील भुयारी गटार योजना, नगर रोडवर जिल्हा न्यायालय आणि जिल्हाधिकारी कार्यालयात जाण्यासाठी दुभाजक खुला करणे, नवीन अटल अमृत योजनेचे नळ कनेक्शन तसेच शहरात सुरू




असलेली स्वच्छता मोहीम या म हत्वपूर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. बीड शहरात भुयारी गटार योजना अर्धवट अवस्थेत बंद पडली आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड: भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांना स्मृतिदिनानिमित्त भाजप कार्यलय येथे ना. पंकजाताई मुंडे व माजी खा.डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शना खाली बीड शहर भाजपा च्या वतीने अभिवादन करतांना प्रा. देविदास नागरगोजे, विक्रांत हजारी, नवनाथ अण्णा शिराळे, सलीम जहांगीर, सुनील मिसाळ, शांतीनाथ डोरले, इर्शाद भाई, संगीताताई धसे, मनोज पाटील, अशोक रसाळ आदी दिसत आहे*



*डॉ.भीमराव पिंगळे विद्यालयात योग गुरू तथा या शाळेचे मा. शिक्षक श्री.सुरवसे सर यांनी विद्यार्थ्यांना योग व प्राणायाम निरोगी, आनंदी, तणावमुक्त जीवन जगण्यासाठी किती आवश्यक आहे याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. शाळेचे मुख्याध्यापक श्री. रोहिदास डोंगरदिवे, प्राथमिकचे मुख्याध्यापक श्री.मुळुक सर यांनी त्यांचे स्वागत केले.*

## महायुतीमुळे भटक्या -विमुक्तांच्या पालावर प्रशासन: डॉ. लक्ष्मण जाधव

**बीड । प्रतिनिधी**

व्ही.आय.पी.लॉन्स पेठ बीड विभागात महाराष्ट्र राज्य भटक्या -विमुक्त विकास परीषद वतीने महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने राजे उमाजी नाईक महाराजस्व अभियान व छत्रपती शिवाजी महाराज महराजस्व अभियान अंतर्गत भटक्या -विमुक्त जातीतील लोकांना केंद्र व राज्य सरकारच्या योजना कार्यान्वित करण्यासाठी लागणारे प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब, लोकनेत्या ना. पंकजाताई साहेब मुंडे व लोकप्रिय दबंग



मा.खा.डॉ.प्रीतमताई साहेब मुंडे यांच्या नेतृत्वाखाली अनेक वर्षांपासून भटक्या -विमुक्त जाती जमातींच्या शासकीय योजनांचा पाठपुरावा गेल्या २५ वर्षांपासून सुरू होतो, यामध्ये यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना, जातप्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, मतदान कार्ड, आधारकार्ड, संजयगांधी निराधार योजना, भटक्या -विमुक्तांसाठी पंतप्रधान आवास घरकुल योजना, श्रावणबाळ योजना,

▶▶ उर्वरित पान २ वर

## अजित दादा... आ. संग्राम जगताप यांची पक्षातून हकलपट्टी करा : शेख युनूस

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री शाहू महाराज, मौलाना आझाद यांना मानणारा राज्य आहे. आणि या राज्यात जर आपल्याच पक्षातील अहमदनगर चे आमदार संग्राम जगताप जर मुसलमान विषयी अपशब्द वापरत असतील. तर मुस्लिम समाज कदापी खपवून घेणार नाही. राष्ट्रवादी पक्ष हा धर्मनिरपेक्ष आणि पुरोगामी विचारसरणी असणारा पक्ष आहे मग आपल्या पक्षात हा जातीवादी आणि सडक्या



विचारांचा आमदार कसा? अशा आमदाराची आपल्या पक्षातून तत्काळ हकालपट्टी करावी आणि आमदारकीचा राजीनामा घ्यावा नाहीतर पुढील काळात मुस्लिम समाज तुमच्या पाठीशी राहणार नाही. आपल्या आमदाराने दोन समाजात तेढ निर्माण करण्याचे काम केलेले आहे. आपण त्याला पाठिशी घालू नये.

## शासनाचा मिळालेला समाजभूषण पुरस्कार हा समाजाचा पुरस्कार आहे :प्रा. डॉ.संजय मेडे

### ● अखिल भारतीय कैकाडी महासंघ बीड च्या वतीने सत्कार संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाचा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार हा मला जरी मिळाला असला तरी हा पुरस्कार समाजाचा पुरस्कार आहे असे मत अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर संजय मेडे यांनी



व्यक्त केले आहे.

अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे बीड जिल्हा अध्यक्ष लक्ष्मण गायकवाड यांनी दिनांक २२ जून रोजी हॉटेल व्यंकटेश येथे प्राध्यापक डॉक्टर संजय मेडे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख राजेंद्र राठोड यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन केले होते या कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी भाजपाचे नेते ज्ञानेश्वर मेंडके हे होते तर मंचावर सचिन राठोड,शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले आझाद क्रांती सेनेचे संस्थापक राजेश घोडे अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण गायकवाड उपस्थित होते.

राष्ट्रसंत राजाराम महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली उपस्थित मान्यवरांच्या व समाज बांधवांच्या वतीने समाजभूषण प्राध्यापक डॉक्टर संजय मेडे यांचा

▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड: बिबट्याने वासरावर केलेल्या हल्लयात वासरू ठार झालं असल्याची माहिती आत्ताच वांगी येथील शेतकऱ्याने फोटो पाठवत दिली आहे. बिबट्याचा वासरावर हल्ला होताच वासरू ओरडले यामुळे शेतकऱ्यांनी तिकडे धाव घेतली असता बिबट्याने तेथून पळ काढला मात्र यात वासरू गतप्राण झाले. अशी माहिती शेतकरी महादेव बापुराव शेळके यांनी दिली आहे. ते वासरू त्यांचेच होते. या हल्लयाने शेतकरी भयग्रस्त झाले असून याकडे वन विभागाने तत्काळ लक्ष देणे आवश्यक आहे.*

# 'आरोग्याची वारी पंढरी दारी' केज तालुका आरोग्य विभागाचा स्तुत्य उपक्रम

## संतश्रेष्ठ गजानन महाराज पालखीतील वारकऱ्यांची केली आरोग्य तपासणी



**केज । प्रतिनिधी**

आषाढीवारी ही महाराष्ट्राची एक महान आणि पवित्र परंपरा आहे, ज्यात लाखो वारकरी पंढरपूरकडे पायी चालत जातात. या लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी दरवर्षी राज्य सरकार, आरोग्य विभाग आणि विविध स्वयंसेवी संस्था महत्त्वाच्या आरोग्य सेवा पुरवत असतात. आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' उपक्रमः राज्य सरकारने आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' हा विशेष उपक्रम सुरू केला आहे, ज्या अंतर्गत केज तालुका आरोग्य विभागामार्फत वारकऱ्यांना उत्तम आरोग्य सेवा आणि आरोग्य तपासणी आदी सुविधा पुरवल्या जात आहेत. संत श्रेष्ठ गजानन महाराज पालखी मार्गावर आणि मुक्कामाच्या ठिकाणी असलेल्या केज तालुक्यातील बोरीसावरगाव येथे आरोग्य विभागाचे सर्व कर्मचारी, डॉक्टर्स आणि स्वयंसेवक सर्वच पालखी सेवेकरी यांच्यासाठी अतोनात प्रयत्नशील असतात. शासकीय रुग्णालयातील कर्मचारी हे देखील वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करतात आणि आवश्यक उपचार देतात ज्यामध्ये महिला वारकऱ्यांसाठी, विशेषतः गरोदर माता आणि लहान मुलांसाठी, हिरकणी कक्ष उभारले जातात. येथे स्त्रीरोगतज्ज्ञ आणि इतर आवश्यक सेवा उपलब्ध असतात. दिंडी

प्रमुखांना औषधांचे कीट उपलब्ध करून दिले जातात, जेणेकरून सामान्य आजारांवर तात्पुरते उपचार करता येतील. पालखी मार्गावरील पाणी स्रोतांचे सर्वेक्षण आणि निर्जंतुकीकरण केले जाते, तसेच हॉटेल आणि धाब्यांवरील कामगारांची आरोग्य तपासणी केली जाते. यामुळे साथीच्या रोगांचा प्रसार रोखण्यास मदत होते.

▶▶ उर्वरित पान २ वर


